# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./३२१ /२०१८ दि.२/०२/२०१८

## परिपत्रक

विषय : " राष्ट्रीय योवायोजन कक्षाकरीता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी" हे पद भरण्याबाबत

संदर्भ : मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. इएसटी-४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१, दि. १५/०१/२०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भीय पत्र प्राप्त असून संलग्नित आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे असल्याने सदर पदाची पात्रता संदर्भीय पत्राप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली असल्याने आपल्यास्तरावर संदर्भीय पत्रान्वये कार्यवाही घेण्यात यावी.

(दिपक एस. जुनघरे)
**कुलसचिव(का)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र - उपरोक्तप्रमाणे

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

E:\LATTER\Circular/162

महाराष्ट्र शासन

क्रमांक : इएसटी-४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१.
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १५ जानेवारी, २०१८.

प्रति,

१.संचालक (उच्च शिक्षण),
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व विद्यापीठांचे कुलसचिव.

विषय : "राष्ट्रीय सेवायोजन कक्षाकरीता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी" हे पद भरण्याबाबत.

राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे.

१) He/She should have served as programme Coordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.

२) He/She should possess the academic qualifications for being appointed as programme Coordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.

३) He/She should have interest in Youth Work in particular and social work in general.

२. तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

१) संपर्क अधिकारी हे पद रिडर स्केल सुधारित वेत)नश्रेणी .रु (१२०००-४२०-१८३००-/ या संवर्गातील राहील .

२) त्यांचे मराठी.हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असावे ,

३) पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पध्दतीने प्रथमतएक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तीच्या कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.

राष्ट्रीय सेवा योजना

४) पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचाऱ्याचे रजेचे नियम लागू होतील.

५) पात्र उमेदवाराची नियुक्ती प्रतिनियुक्ती पध्दतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही. आणि म्हणून त्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowance) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.

६) पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवायोजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापिठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परिक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिध्द सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.

७) पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वतःला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल. त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

३. वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवावेत. त्याकरीता वर्तमानपत्रांतही जाहिरात देण्यांत यावी. विद्यापीठांनी त्यांचेकडील अर्ज संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडे एकत्रित पाठवावे. संचालकांनी विद्यापिठांकडून प्राप्त झालेले अर्ज व त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन व उमेदवारांची नावे त्यांच्या संपूर्ण तपशिलासह (Bio-Data) तसेच गोपनीय अभिलेखासह शासनाकडे आपल्या शिफारशीसह पुढील कार्यवाहीसाठी सादर करावे.

या संदर्भातील कार्यवाही तात्काळ करावी व अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.